(७)

# महाराष्ट्र शासन

महाराष्ट्र शासन

रा.कों.धनावडे
उप सचिव

क्रमांक : संकीर्ण-२०२०/प्र.क्र.०५/गृनिभू
गृहनिर्माण विभाग, ३ रा मजला
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
दिनांक : ०७ ऑगस्ट,२०२०

विषय:- म्हाडा प्राधिकरणामधील गट-"अ" आणि गट-"ब" (वर्ग-१ व वर्ग-२) संवर्गातील अधिकारी/कर्मचाऱ्यांच्या बदलीबाबत.

संदर्भ :- शासनाची समक्रमांकाची दि. १० जुलै,२०२० व दि.१७ जुलै, २०२० ची पत्रे .

महोदय,

उपरोक्त विषयाबाबत शासनाच्या संदर्भाधीन दि.१०.०७.२०२० च्या पत्रान्वये दि.३०.०६.२०२० पर्यंतची अद्ययावत माहिती शासनास सादर करण्याबाबत कळविण्यात आले होते. त्यानुसार सचिव, म्हाड प्राधिकरण यांच्याकडून दि.१४.०७.२०२० च्या पत्रान्वये म्हाड प्राधिकरण व त्याअंतर्गत मंडळात कार्यरत असणाऱ्या वर्ग-१ आणि वर्ग-२ अधिकाऱ्यांची माहिती प्राप्त झाली आहे. तथापि, सदर माहितीमध्ये शाखा अभियंता (वर्ग-२) संवर्गातील अधिकाऱ्यांची माहिती शासनास प्राप्त झालेली नाही.

गृहनिर्माण विभागाच्या दि. १७ जुलै, २०१९ च्या शासननिर्णयान्वये महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण व त्याअंतर्गत सर्व विभागीय मंडळातील गट-अ व गट-ब (वर्ग-१ व वर्ग-२) संवर्गातील सर्व अधिकाऱ्यांच्या नियतकालीक तसेच मुदतपुर्व बदल्यांचे अधिकार शासनास आहेत.त्यानुसार शाखा अभियंता हे पद वर्ग-२ मध्ये येत असल्याने सदर पदावरील बदल्यांचे अधिकारदेखील शासनास आहेत. त्यामूळे सदरच्या बदल्या म्हाड प्राधिकरणाच्या स्तरावर करता येणार नाहीत. यास्तव, सदरची माहिती तात्काळ पाठविण्याबाबत शासनाच्या दि.१७.०७.२०२० च्या पत्रान्वये म्हाड प्राधिकरणास पुनश्च कळविण्यात आले असूनदेखील अद्यापही सदरची माहिती प्राप्त झालेली नाही.

सामान्य प्रशासन विभागाच्या दि.२३.०७.२०२० च्या आदेशानुसार चालू वित्तीय वर्षातील सर्वसाधारण बदल्या दि.१०.०८.२०२० पर्यंत करणे आवश्यक आहे. तथापि, म्हाड प्राधिकरणाकडून शाखा अभियंता (वर्ग-२) संवर्गातील जून,२०२० पर्यंतची अद्ययावत माहिती प्राप्त न झाल्याने सदर संवर्गातील बदल्या शासन स्तरावर प्रस्तावित करता येत नाहीत. सदर बदल्या विहित मुदतीत प्रस्तावित न झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी म्हाड प्राधिकरणाची राहील . सबब,शाखा अभियंता (वर्ग-२) संवर्गातील दि.३०.०६.२०२० पर्यंतची अद्ययावत माहिती आजच उलटटपाली पाठविण्याबाबत आपल्या स्तरावरुन संबंधितांना आदेश द्यावेत, ही विनंती. आदरपूर्वक.

आपला
Dhanawade 7/8/2020
(रा.कों.धनावडे)

प्रति,

श्री.मिलिंद म्हैसकर
उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी,
महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण.
गृहनिर्माण भवन, बांद्रे (पूर्व),मुंबई- ४०० ०५१

C:\Desai\Transfers\गट अ आणि ब सांख्यिकी माहिती.docx